तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, ३ सप्टेंबर २०२५

आतील पानावर

पान २ – 'कॅप्टन इंडिया'मध्ये कार्तिक आर्यन
पान ३ – रणवीर सिंहसोबत जमणार श्रीलीलाची...
पान ४ – रवीनाची लेक राशा तेलगू सिनेमात
पान ५– राणादाच्या 'अरण्य' चित्रपटाचा टीझर ...
पान ६ – 'कॉकटेल २'मध्ये क्रीतिची एन्ट्री

# 'डू यू वॉना पार्टनर'मध्ये 'या' अभिनेत्री दिसणार एकत्र

दिग्दर्शक करण जोहरने एका नवीन मालिकेची घोषणा केली आहे. मालिकेचा पहिला पोस्टर रिलीज करताना करणने तिच्या प्रदर्शन तारखेची माहिती देखील शेअर केली आहे. या मालिकेत अभिनेत्री तमन्ना भाटिया आणि डायना पेंटी मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. करण जोहरने 'डू यू वॉना पार्टनर' या नवीन मालिकेची घोषणा केली आहे. करणने त्याच्या इंस्टाग्रामवर मालिकेचा पहिला पोस्टर शेअर केला आहे. या पोस्टरमध्ये मालिकेतील मुख्य अभिनेत्री तमन्ना भाटिया आणि डायना पेंटी दिसत आहेत. पोस्टरमध्ये दोन्ही अभिनेत्री चष्मा घातलेल्या दिसत आहेत. करणने त्याची प्रदर्शन तारीख देखील जाहीर केली आहे, त्यानुसार ही नवीन मालिका १२ सप्टेंबरपासून प्राइम व्हिडिओवर स्ट्रीम होईल. तथापि, अद्याप या मालिकेबद्दल कोणतीही अधिक माहिती समोर आलेली नाही किंवा त्यातील कलाकारांचा खुलासा झालेला नाही. परंतु तमन्ना आणि डायना व्यतिरिक्त, करण जोहरने त्याच्या पोस्टमध्ये नकुल मेहता, श्वेता तिवारी, जावेद जाफरी, नीरज कबी आणि रणविजय सारख्या कलाकारांचाही उल्लेख केला आहे. त्यामुळे हे स्टार्स देखील या मालिकेचा प्रमुख भाग असू शकतात अशी अपेक्षा आहे.







# त्याला कधीच कोणी गांभीर्यानं घेतलं नाही!


अभिनेता अक्षय कुमारने १९९१ साली प्रदर्शित झालेल्या 'सौगंध' या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केले होते. त्यानंतर अभिनेत्याने खिलाडी कुमार म्हणून ओळख मिळवली. गेल्या ३८ वर्षांपासून अक्षय कुमार अविरतपणे प्रेक्षकांचे मनोरंजन करीत आहे. मात्र, अनेकदा त्याच्या अभिनयाचे पुरेसे कौतुक केले जात नाही. त्याला त्याच्या कामाचे श्रेय दिले जात नाही, असे वक्तव्य चित्रपट निर्माते, दिग्दर्शक विपुल शाह यांनी केले आहे. विपुल शाह यांनी नुकतीच एक मुलाखत दिली. या मुलाखतीत अक्षय कुमारबद्दल ते म्हणाले, जेव्हा मी माझ्या पहिल्या दोन चित्रपटांत अक्षयबरोबर काम करीत होतो, त्यावेळी मला जाणवले की, हा असा अभिनेता आहे, जो स्वत:च्या क्षमतांबाबत अनभिज्ञ आहे. तो काय करू शकतो, याची त्याला जाणीव नाही. शाह पुढे म्हणाले, त्याला ॲक्शन हीरोचं लेबल लावलं गेलं. त्यानंतर त्यानं विनोदी चित्रपटांत काम करीत त्याची ही प्रतिमा पुसून काढण्याचा प्रयत्न केला; पण त्याला कधीच कोणी फार गांभीर्यानं घेतलं नाही. पण, मला वाटतं की, त्याच्याकडे देण्यासारखं खूप काही आहे. अक्षय कुमार गोष्टींकडे खूप विचारपूर्वक पाहतो, हे त्याच्याबरोबर काम केल्यावर जाणवतं. पण, लोक त्याला दुरून पाहतात आणि जज करतात. ते म्हणाले, जेव्हा तुम्ही एखाद्या कलाकाराबरोबर काम करता, त्यावेळी तुम्हाला त्या कलाकाराला जवळून जाणून घेण्याची संधी मिळते. एखाद्या सीनकडे ते कसे पाहतात. सहजपणे ते त्यांच्या पात्रात कसे बदल करू शकतात, हे बारकाईनं पाहायला मिळतं. विपुल शाह असेही म्हणाले, अक्षय कुमारनं स्वत:ला अनेकदा सिद्ध केलं आहे. त्याला सतत अपयशाला सामोरं जावं लागत होतं. तरीही त्यानं प्रयत्न केले.

# मला पुन्हा एकदा प्रेमात पडायचंय



अलीकडेच, कोरिओग्राफर धनश्री वर्माने तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल आणि कारकिर्दीबद्दल एक मुलाखत दिली. या संभाषणात तिने क्रिकेटपटू युजवेंद्र चहलशी झालेल्या घटस्फोटाबद्दलही सांगितले. एका मुलाखतीत बोलताना धनश्री म्हणते, 'मला वाटते की आपल्या सर्वांना आयुष्यात प्रेम हवे आहे. प्रेम कोणाला नको असते? कधीकधी प्रेम तुम्हालाही प्रेरित करते. याशिवाय, स्वतःवर प्रेम केले पाहिजे, कारण स्वतःवर प्रेम करणे सर्वात महत्वाचे आहे.

स्वतःवर प्रेम करा, नंतर बाहेर प्रेम शोधा.' धनश्री भविष्यात प्रेम नको असते का? या प्रश्नावर ती म्हणते, 'जर माझ्या आयुष्यात काही चांगले लिहिले असेल तर का नाही? खरं तर, पालकांनाही ते हवे असते. मित्रांनाही ते हवे असते. मी स्वतः फक्त चांगल्या गोष्टी घडाव्यात असे इच्छिते. प्रेम कोणाला नको असते? आपण सर्वजण प्रेमाचे भुकेले आहोत. आज, हेच कमी आहे. ही सर्वात सुंदर गोष्ट आहे. ही पूर्णपणे बॉलिवूडची भावना आहे. ही भावना कोणाला नको आहे? आपल्या सर्वांना ती हवी आहे आणि आपण सर्वांना ती अनुभवायला हवी. सर्वांना असे प्रेम मिळायला हवे.' तिच्या मुलाखतीत धनश्रीने घटस्फोटाबद्दलही बोलले. धनश्री म्हणाली की न्यायालयात घटस्फोटाचा निकाल जाहीर होताच ती स्वतःवर नियंत्रण ठेवू शकली नाही आणि सर्वांसमोर मोठ्याने रडू लागली. तिने सांगितले की ती आतून तुटली होती आणि त्या क्षणाचे शब्दात वर्णन करणे तिच्यासाठी शक्य नव्हते. तर युजवेंद्र चहल त्या वेळेपूर्वीच कोर्टातून निघून गेला होता.



# 'कॅप्टन इंडिया'मध्ये कार्तिक आर्यन

अभिनेता कार्तिक आर्यन हा 'कॅप्टन इंडिया' चित्रपटात वायुदल वैमानिकाची भूमिका साकारणार असल्याचे समोर आले आहे. कार्तिकची निवड दिग्दर्शक शिमित अमिन यांच्या चित्रपटात झाली असून यात तो वैमानिकाच्या भूमिकेत दिसून येणार आहे. शिमित यांना 'अब तक छप्पन' आणि 'चक दे! इंडिया' यासारख्या चित्रपटांसाठी ओळखले जाते. कार्तिक आणि शिमित यांच्यात मागील एक वर्षापासून बोलणी सुरू आहेत. दोघांदरम्यान अनेक विषयांवर चर्चा सुरू हाहेती. याचदरम्यान शिमितने कार्तिकसमोर 'कॅप्टन इंडिया'ची कहाणी मांडली होती. कार्तिकने या कहाणीला होकार दर्शविला आहे. शिमित या चित्रपटाचे चित्रिकरण पुढील वर्षी सुरु करण्याच्या तयारीत आहे. चित्रपटाची कहाणी सत्यघटनेवर आधारित असणार आहे. याचे चित्रिकरण भारत तसेच मोरक्कोमध्ये पार पडणार आहे. हा चित्रपट २०२७ च्या पहिल्या सहामाहीत प्रदर्शित केला जाऊ शकतो. कार्तिक सध्या 'तू मेरी मैं तेरा मैं तेरा तू मेरी' या चित्रपटाच्या चित्रिकरणात व्यग्र आहे.

# ‘खोसला का घोसला’च्या सीक्वेलमध्ये हुमा

२००६ साली प्रदर्शित चित्रपट ‘खोसला का घोसला’ बॉक्स ऑफिसवर गाजला होता. दिवाकर बॅनर्जींच्या दिग्दर्शनात तयार या चित्रपटात अनुपम खेर, बोमन इराणी, विजय पाठक, रणवीर शौरी आणि प्रवीण डबास यांनी महत्त्वाची भूमिका साकारली होती. डार्क कॉमेडीयुक्त या चित्रपटाचा आता सीक्वेल तयार केला जाणार आहे. दिग्दर्शक उमेश बिष्ट आणि त्यांच्या टीमने याची पटकथा तयार केली आहे. या चित्रपटासाठी आता कलाकारांची निवड केली जात आहे. ‘खोसला का घोसला २’मध्ये हुमा कुरैशी महत्त्वाची भूमिका साकारणार असल्याचे सांगण्यात येत आहे. तिने पटकथा ऐकली असून तिची पसंतीही मिळाली असल्याचे समजते. या चित्रपटाचे चित्रिकरण नोव्हेंबर महिन्यात सुरू होणार आहे. चित्रपट पुढील वर्षी प्रदर्शित केला जाणार असल्याने निर्मात्यांकडे बराच कालावधी असणार आहे. हुमा याचबरोबर ‘टॉक्सिक’ चित्रपटात दिसून येणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन गीतू मोहनदास करत आहेत. या चित्रपटात यश, नयनतारा, कियारा अडवाणी, तारा सुतारिया आणि अक्षय ओबेरॉय असणार आहेत.



# विवेकने मला कसलीच मदत केली नाही



बॉलिवूड ज्येष्ठ अभिनेते सुरेश ओबेरॉय १९७० च्या दशकाच्या उत्तरार्धापासून चित्रपटसृष्टीत काम करीत होते. तरीही त्यांना तितकीशी लोकप्रियता मिळाली नाही. मात्र, त्यांचा मुलगा जेव्हा विवेक ओबेरॉय अभिनय क्षेत्रात आला, त्यावेळी त्याला मोठी लोकप्रियता मिळाली. त्यानंतर काही वर्षांतच विवेकचा चुलतभाऊ अक्षय ओबेरॉयनेदेखील बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. पण, त्याला स्टार असलेल्या विवेककडून कोणतीही मदत मिळाली नाही, असे वक्तव्य अक्षय ओबेरॉयने एका मुलाखतीत केले आहे. अक्षय ओबेरॉयने नुकतीच एक मुलाखत दिली आहे. या मुलाखतीत त्याला विचारले गेले की, जेव्हा त्याने बॉलीवूडमध्ये पदार्पण केले, त्यावेळी भाऊ विवेकची मदत का घेतली नाही? त्यावर अक्षय म्हणाला, दुर्दैवानं, त्यावेळी माझ्या आणि विवेकमध्ये फारसा संवाद नव्हता. म्हणजे मी फोन करून त्याला काही सांगितले, असे झाले नाही. मी कधीच त्याच्याकडून मदत मागितली नाही. त्यानेदेखील मला मदत हवी आहे का, असे स्वत:हून विचारले नाही. खूप काळापर्यंत लोकांना हे माहित नव्हते की आम्ही एकाच कुटुंबातील आहोत, आम्ही एकमेकांचे चुलत भाऊ आहोत. पण, आता मला थोडी लोकप्रियता मिळत आहे, तर लोकांना हे माहित होत आहे की मीसुद्धा त्याच ओबेरॉय कुटुंबातील आहे. अभिनेत्याला जेव्हा विचारले की विवेक आणि त्याचे कुटुंब एकमेकांच्या संपर्कात आहे का? यावर अक्षय म्हणाला, ते फारसे एकमेकांच्या संपर्कात नाही. पण, पूर्वीपेक्षा त्यांच्यात चांगले संबंध आहेत. मला वाटते की जुन्या पिढीतील लोक वृद्ध होते. त्यांना याची जाणीव होत आहे की भूतकाळात जे काही घडले ते सोडून दिले पाहिजे. मला खात्री आहे की त्यांच्या पंजाबी अहंकारामुळे त्यांच्यात वाद-विवाद झाले असीतल. विवेक किंवा ओबेरॉय कुटुंबाकडून कोणतीही मदत मिळाली नसली तरीही अक्षयने कृतज्ञता व्यक्त केली. तो म्हणला, मी त्यांच्याप्रति कृतज्ञ आहे. कारण त्यांच्या यशामुळे मला असे वाटू लागले, हे माझ्यासाठीदेखील शक्य आहे. मला त्यांच्याकडून प्रेरणा मिळाली. पण, त्यांच्याकडून कोणतीही मदत मिळाली नाही. अक्षय ओबेरॉयच्या कामाबद्दल बोलायचे तर त्याने हृतिक रोशची प्रमुख भूमिका असलेल्या फायटर या चित्रपटात महत्वाची भूमिका साकारली होती. तसेच, तो लवकरच जान्हवी कपूर व वरुण धवन यांची प्रमुख भूमिका असलेल्या ‘सनी संस्कारी की तुलसी कुमारी’ या चित्रपटात प्रमुख भूमिका साकारली होती.



# रणवीर सिंहसोबत जमणार श्रीलीलाची जोडी

रणवीर सिंह सध्या स्वत:चा आगामी चित्रपट ‘धुरंधर’च्या तयारीत व्यग्र आहे. तर रणवीर आता बॉबी देओलसोबत एका बिगबजेट चित्रपटात काम करणार आहे. या चित्रपटात श्रीलीला ही दाक्षिणात्य अभिनेत्री मुख्य भूमिकेत असणार आहे. रणवीर आणि श्रीलीला ही जोडी या चित्रपटाच्या निमित्ताने प्रेक्षकांना पाहता येणार आहे.

सध्या या चित्रपटातील अन्य कलाकारांची नावे अद्याप उघड करण्यात आलेली नाहीत. हा चित्रपट निव्वळ करमणूकप्रधान असल्याचे मानले जात आहे. यात ॲक्शन, ड्रामा आणि स्टार पॉवरचे मिश्रण दिसून येणार आहे. रणवीरने या चित्रपटाची देखील तयारी सुरू केली आहे. रणवीरचा धुंरधर हा चित्रपट डिसेंबर महिन्यात प्रदर्शित होणार आहे. याचबरोबर तो डॉन ३ चित्रपटात काम करत आहे. तर श्रीलीला ही सध्या बॉलिवूड आणि दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील सर्वाधिक मागणी असलेली अभिनेत्री ठरली आहे. अनुराग बासूकडून दिग्दर्शित रोमँटिक म्युझिकल चित्रपटात ती कार्तिक आर्यनसोबत दिसून येणार आहे. या चित्रपटाचे नाव अद्याप ठरलेले नसले तरीही सध्या याला आशिकी ३ असे नाव दिले जात आहे.

# रवीनाची लेक राशा तेलगू सिनेमात

अभिनेत्री रवीना टंडनची कन्या राशा थडानीने अल्पावधीतच प्रेक्षकांची मन जिंकली आहे. अलीकडेच तिने 'आझाद' या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केले होते. यात अभिनेता अजय देवेगण मुख्य भूमिकेत दिसला होता. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर अपयशी ठरला असला तरी यातील राशाच्या 'ऊई अम्मा हाय हाय' या गाण्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या गाण्यामुळे राशाचे अनेकांकडून कौतुक करण्यात आले. यानंतर आता तिला अनेक मोठ्या प्रोजेक्ट्सची ऑफर मिळत आहे. आता ती दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीकडे वळाली आहे. लवकरच ती तेलुगू चित्रपटात पदार्पण करणार असल्याची माहिती समोर येत आहे. ती सुपरस्टार महेश बाबू यांचा पुतण्या आणि दक्षिणेतील प्रसिद्ध निर्माता रमेश बाबू यांचा मुलगा जय कृष्णा घट्टामनेनी याच्या सोबत तेलुगू चित्रपटात पदार्पण करणार आहे. महेश बाबूच्या पुतण्या ही नायक म्हणून पहिलीच फिल्म असणार आहे. "RX100' आणि 'मंगलवारम' यांसारखे हिट चित्रपट देणारे दिग्दर्शक अजय भूपति या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहेत. तेलुगू चित्रपटसृष्टीत नवे चेहरे सादर करण्यासाठी प्रसिद्ध असलेले दिग्दर्शक म्हणून त्यांची ओळख आहे. जय कृष्णा आणि राशा थडानी यांच्या या चित्रपटाचे निर्मिती वैजयंती मूव्हीज आणि आनंदी आर्ट क्रिएशन्सच्या बॅनरखाली होणार आहे. विशेष म्हणजे, वैजयंती मूव्हीजने यापूर्वी 'सीता रामम' आणि 'कल्कि 2898 -D' यांसारखे चित्रपट दिले आहेत. या चित्रपटाचे चित्रीकरण दसऱ्यानंतर, साधारण १५ ऑक्टोबरपासून सुरू होईल आणि लवकरच निर्मिती याची घोषणा करण्याची शक्यता आहे. राशा थडानी या चित्रपटाव्यतिरिक्त 'लाईके लायका' या चित्रपटात दिसणार आहे. याशिवाय, ती इब्राहिम अली खानसोबत देखील नव्या प्रोजेक्टमध्ये काम करत आहे.






# कुंभमेळ्यातील व्हायरल गर्ल मोनालिसा मल्याळम सिनेमात

प्रयागराज कुंभमेळ्यात चर्चेत आलेली मोनालिसा आता चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवत आहे. तिचं खरं नाव मोना भोसले असून ती मूळची इंदूरची आहे. कुंभमेळ्यात माळा विकताना तिच्या सौंदर्यामुळे ती अचानक चर्चेत आली होती. तिचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले होते. मोनालिसा लवकरच 'नागम्मा' या मल्याळम चित्रपटात झळकणार आहे. तिच्यासोबत अभिनेता कैलाश मुख्य भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटाचं दिग्दर्शन पी. बिनू वर्गिस यांनी केलं असून, निर्मिती जिली जॉर्ज यांनी केली आहे. चित्रपटाचं चित्रीकरण सुरू असून सप्टेंबर अखेरपर्यंत ते पूर्ण होणार आहे.

जानेवारी महिन्यात मोनालिसाचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आणि ती प्रसिद्ध झाली. मात्र या प्रसिद्धीमुळे तिच्या माळ विक्रीच्या व्यवसायावर परिणाम झाला. अनेक लोक फोटो-व्हिडिओ काढण्यासाठी तिच्यामागे लागतात, त्यामुळे तिच्या रोजीरोटीवर परिणाम होतो, असं तिच्या कुटुंबीयांनी सांगितलं. मोनालिसा वयाने अवघी १६ वर्षांची आहे. तिला प्रसिद्धीपेक्षा उपजीविकेसाठीचा व्यवसाय जास्त महत्त्वाचा आहे, हे तिनं काही दिवसांपूर्वी माध्यमांनाही सांगितलं होतं.

याआधी मोनालिसाला एक हिंदी चित्रपटाची ऑफर मिळाली होती, पण तो प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही. मात्र आता ती मल्याळम चित्रपटातून अधिकृतपणे पदार्पण करत आहे.

# ज्युनिअर एनटीआरच्या दोन मोठ्या प्रोजेक्ट्सची घोषणा

साऊथ सिनेमातून थेट बॉलीवूडमध्ये एन्ट्री करत दाक्षिणात्य अभिनेता ज्युनिअर एनटीआर याने त्याच्या वॉर २ सिनेमातून धमाकेदार एन्ट्री केली. अशातच आता ज्युनिअर एनटीआरच्या त्याच्या दोन मोठ्या सिनेमांची घोषणा करण्यात आली आहे. इंडस्ट्रीतील एका सूत्राने दिलेल्या माहितीनुसार, वॉर २ नंतर ज्युनिअर एनटीआरचे दोन मोठे प्रोजेक्ट्सची सुरुवात केली जाणार आहे. या सिनेमांपैकी एका सिनेमाच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. देवरा २ असं या सिनेमाच नाव आहे. या सिनेमाच दिग्दर्शन प्रशांत नील करणार आहेत. तर दुसर्या सिनेमाच नाव अद्याप समोर आलेलं नाही. तसेच ज्युनिअर एनटीआरच्या आणखी काही सिनेमांची चर्चा होत आहे. मीडिया रिपोर्टनुसार, ज्युनिअर एनटीआरची सुरुवातीपासूनच ही योजना होती की, 'वॉर २' नंतर तो सर्वप्रथम प्रशांत नीलच्या सिनेमावर काम करेल. देवरा २ ऐवजी या सिनेमाचं टेंटेटिव्ह टायटल 'ड्रॅगन' असं ठेवण्यात आलं आहे. देवरा हा ज्युनिअर एनटीआर आणि अभिनेत्री जान्हवी कपूर यांचा सिनेमा आहे. त्याचा हा सिनेमा सीक्वल असणार आहे. २०२४ मध्ये हा सिनेमा रिलीज झाला होता. या सिनेमाला चांगला प्रतिसाद प्रेक्षकांनी दिला होता. सध्या जान्हवी तिच्या परम सुंदरी सिनेमाच्या प्रमोशनमध्ये बिझी आहे. यामुळे देवरा २ मध्ये कोणती अभिनेत्री दिसणार हे पाहणं महत्वाचं असणार आहे.



# ‘ही’ मराठमोळी अभिनेत्री झळकणार अक्षयच्या सिनेमात

लोकप्रिय बॉलीवूड अभिनेता अक्षय कुमारने नुकतीच त्याच्या आगामी चित्रपटाची घोषणा केली. नुकताच त्याने सोशल मीडियावर त्याच्या ‘हैवान’ या आगामी थ्रिलर चित्रपटाचा व्हिडिओ शेअर करीत चाहत्यांना माहिती दिली.

अशातच आता या चित्रपटात त्याच्यासह मराठमोळ्या अभिनेत्रीची वर्णी लागली असल्याचे म्हटले जात आहे. अक्षय कुमारच्या ‘हैवान’ या आगामी थ्रिलर चित्रपटाचे दिग्दर्शन ‘फिर हेरा फेरी ३’चे दिग्दर्शक प्रियदर्शन करणार आहेत. विशेष बाब म्हणजे या चित्रपटात अक्षय कुमार व सैफ अली खान तब्बल १८ वर्षांनंतर एकत्र काम करीत आहेत. त्यांच्यासह या चित्रपटात बोमन इराणीसुद्धा झळकणार आहेत. अशातच आता अभिनेते, दिग्दर्शक सचिन पिळगावकर यांची लेक अभिनेत्री श्रिया पिळगावकरही या चित्रपटामध्ये झळकणार असल्याचे म्हटले जात आहे. श्रिया पिळगावकरची या चित्रपटासाठी निवड झाली असून, ती अक्षय कुमार व सैफ अली खान यांच्यासह झळकणार आहे.

श्रिया पहिल्यांदाच अक्षय कुमार व सैफ अली खान यांच्यासह काम करणार आहे. या चित्रपटाची घोषणा झाली तेव्हापासूनच याबद्दल चर्चा सुरू आहे. ‘हैवान’ हा चित्रपट या मल्याळी चित्रपटाचा रिमेक आहे. नुकतेच या चित्रपटाचे चित्रीकरण सुरू झाले असून, स्वत: अक्षय कुमारनेच याबद्दल सोशल मीडियावरून माहिती दिली होती. अक्षय व सैफ १८ वर्षांनी या चित्रपटाच्या निमित्ताने एकत्र काम करणार आहेत. ते दोघे शेवटचे ‘टशन’ या २००८ साली आलेल्या चित्रपटात झळकले होते. श्रिया गेल्या काही दिवसांत ‘मंडला’ मर्डर्स या तिच्या वेब सीरिजमधील कामामुळे चर्चेत होती. अनेकांनी तिचे यासाठी कौतुक केले. स्वत: सचिन पिळगावकर व सुप्रिया यांनी सोशल मीडियावर पोस्ट करीत लेकीचे कौतुक केले होते. तिने २०१६ साली आलेल्या ‘फॅन’ चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केले होते. त्यानंतर तिने ‘मिर्झापूर’, ‘गिल्टी माईंड्स’, ‘द ब्रोकन न्यूज’ व ‘ताजा खबर’ यांसाख्या वेब सीरिजमध्ये काम केले आहे.





नुकताच वडापाव या नव्या मराठी सिनेमाचा टीझर प्रदर्शित झाला आहे. या सिनेमाच्या धमाल टीझरमधून नात्यांमधील गोडवा आणि तिखटपणा याची सांगड घालण्यात आली आहे. या सिनेमात एक गोड कुटुंबाची तिखट लव्हस्टोरी पाहायला मिळणार आहे. सोशल मीडियावर या टीझर प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे. ही रुचकर पाककृती अभिनेता आणि दिग्दर्शक प्रसाद ओक प्रेक्षकांसाठी घेऊन आला आहे. खरंतर मराठीतील नावाजलेला अभिनेता आणि त्याचबरोबर दिग्दर्शक म्हणून प्रसाद ओक याच्याकडे पाहिले जाते. आजवर त्याने अनेक

# प्रसादच्या नव्या सिनेमाचा टीझर प्रदर्शित

मराठी सिनेमांचे दिग्दर्शन केलं आहे. त्याच्या अभिनय कारकिर्दीतील त्याचा हा शंभरावा सिनेमा असून तो पहिल्यांदाच एकाच वेळी दिग्दर्शक आणि अभिनेता या दुहेरी भूमिका साकारताना दिसणार आहे.

या सिनेमात प्रसाद ओक, अभिनय बेर्डे, गौरी नलावडे, रसिका वेंगुर्लेकर, शाल्व किंजवडेकर, रितिका श्रोत्री, समीर शिरवाडकर, सिद्धार्थ साळवी, अश्विनी देवळे-किन्हीकर आणि सविता प्रभुणे यांच्या प्रमुख भूमिका आहेत. एबी इंटरनॅशनल फिल्म्स एलएलपी, मर्ज एक्सआर स्टुडिओ, व्हिक्टर मुव्हीज लिमिटेड आणि अमेय विनोद खोपकर एंटरटेनमेंट आणि मोहसीन खान प्रस्तुत, सिनेमॅटिक किडा बॅनर अंतर्गत, प्रसाद ओक दिग्दर्शित वडा पाव हा सिनेमा आहे.

अमित बस्नेत, प्रजय कामत, स्वाती खोपकर आणि निनाद नंदकुमार बत्तीन हे या सिनेमाचे निर्माते आहेत.

# राणादाच्या ‘अरण्य’ चित्रपटाचा टीझर प्रदर्शित

‘तुझ्या माझ्या संसाराला आणि काय हवं’, ‘नामदेव बी एस्सी ॲग्री’, ‘जाऊ बाई गावात’, ‘तुझ्यात जीव रंगला’ या चित्रपट, मालिका आणि रिॲलिटी शोचे सूत्रसंचालन अशा विविध भूमिकांतून अभिनेता हार्दिक जोशी प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या सगळ्यात ‘तुझ्यात जीव रंगला’ या मालिकेतील त्याची राणा दा ही भूमिका मोठी गाजली. त्याच्या भूमिकेला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. आजही अभिनेत्याला राणा दा म्हणून ओळखले जाते. आता प्रेक्षकांचा लाडका राणा दा एका वेगळ्या अंदाजात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. ‘अरण्य’ या चित्रपटातून हार्दिक जोशी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकताच या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला आहे. या टीझरच्या सुरुवातीलाच एक मोठे जंगल पाहायला मिळते. त्यानंतर हार्दिक जोशीची एंट्री होते. तो म्हणतो, मला माझी लोकं या जंगलाचा वाघ म्हणायची. पुढे त्याच्या हातात एक बंदूक पाहायला मिळत आहे. तो म्हणतो, बंदूक माझी ओळख होती, पण जेव्हापासून ही वेडाबाई माझ्या आयुष्यात आली, तेव्हापासून सगळंच बदललं. पुढे चित्रपटातील इतर कलाकारांची झलक पाहायला मिळते. सुरेश विश्वकर्मा, विजय निकम, विना जगताप, चेतन चावडा, हतिका पाटील हे कलाकार दिसत आहेत. टीझरमध्ये पुढे एका लहान मुलीचा आवाज ऐकायला मिळतो. ती म्हणते, बाबा सांग ना, आपण या जंगलातून कुठे चाललोय? मला खूप भीती वाटतेय. शरद पाटील आणि अंजली पाटील यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. हा चित्रपट १९ सप्टेंबर २०२५ ला प्रदर्शित होणार आहे. आता हार्दिक जोशीला बर्याच दिवसांनंतर पडद्यावर पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत. चित्रपटाची नेमकी गोष्ट काय असणार हे पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत. या चित्रपटात अभिनेत्री वीणा जगतापची देखील झलक पाहायला मिळाली.



# वरूण आणि जान्हवीचा सिनेमा रिलीजसाठी सज्ज

अभिनेत्री प्रेक्षक वरुण धवन आणि जान्हवी कपूर यांच्या आगामी 'सनी संस्कार की तुलसी कुमारी' या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत. नुकतेच या चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण झाले आहे. आता या चित्रपटाबद्दल नवीन माहिती समोर आली आहे. निर्मात्यांनी चित्रपटाचा टीझर प्रदर्शित केला आहे. चित्रपटाचे निर्माते करण जोहर यांनी त्यांच्या इंस्टाग्रामवर चित्रपटाच्या टीझरशी संबंधित माहिती शेअर केली आहे. करण यांनी चित्रपटाचे मोशन पोस्टर देखील रिलीज केले आहे. हा एक व्हिडिओ आहे, ज्यामध्ये चित्रपटातील कलाकारांचे वेगवेगळे पोस्टर्स आणि चित्रपटाचे काही पोस्टर्स दिसत आहेत. यासोबतच, वरुण आणि जान्हवीसह चित्रपटातील कलाकारही वेगवेगळे पोझ देताना दिसत आहेत. हे शेअर करताना करणने त्याच्या कॅप्शनमध्ये लिहिले आहे, 'मंडप सजेगा, मेहफिल जमेगी. पण सनी आणि तुलसीची एन्ट्री संपूर्ण पटकथा बदलून टाकेल.' यासोबतच करणने चित्रपटाच्या टीझरबद्दल माहिती दिली आहे. 'सनी संस्कार की तुलसी कुमारी' हा चित्रपट २ ऑक्टोबर रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. 'सनी संस्कार की तुलसी कुमारी' मध्ये वरुण धवन आणि जान्हवी कपूर व्यतिरिक्त रोहित सराफ, सान्या मल्होत्रा, मनीष पॉल आणि अक्षय ओबेरॉय हे देखील मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन शशांक खेतान यांनी केले आहे, ज्यांनी यापूर्वी 'हम्प्टी शर्मा की दुल्हनिया' आणि 'बद्रीनाथ की दुल्हनिया' हे चित्रपट दिग्दर्शित केले आहे. यापूर्वी हा चित्रपट दुल्हनिया फ्रँचायझीचा भाग असणार होता. परंतु नंतर त्याचे नाव बदलून 'सनी संस्कार की तुलसी कुमारी' असे ठेवण्यात आले. हा एक कौटुंबिक मनोरंजन करणारा चित्रपट असणार आहे.

अलिकडेच चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण झाले आहे. याबाबत माहिती देताना, चित्रपटाच्या कलाकारांनी सोशल मीडियावर फोटो पोस्ट केले होते, ज्यामध्ये संपूर्ण स्टारकास्ट एकाच फोटोत दिसत होती. यादरम्यान सर्वांनी एक खास प्रकारचा टी-शर्टही घातला होता. चित्रपटाचे शूटिंग पूर्ण झाल्यानंतर वरुण धवनने सेटवरील अनेक फोटो शेअर केले. या फोटोंमध्ये वरुण करण जोहर आणि दिग्दर्शक शशांक खेतानसोबत दिसत होता. हे फोटो शेअर करताना वरुणने कॅप्शनमध्ये लिहिले की, हा चित्रपट पूर्ण झाला आहे आणि मी शशांक खेतानच्या दिग्दर्शनाखाली पुन्हा प्रेक्षकांना भेटायला येत आहे.



# रागिनी एमएमएस 3 मध्ये दिसणार तमन्ना



साऊथ सिनेमा इंडस्ट्रीत आपल्या अभिनयाने प्रेक्षकांवर मोहिनी घालणारी अभिनेत्री तनन्ना भाटिया आता बॉलिवूडमध्ये आपल्या दिलखेचक अदांनी सतत चर्चेत असते. खरंतर तमन्ना हिला खऱ्या अर्थाने लोकप्रियता मिळवून दिली ती बाहुबली या सिनेमाने. या सिनेमानंतर तिने अनेक हिंदी सिनेमांत भूमिका केल्या आहेत. तिचा चाहतावर्ग देखील मोठा आहे. आता तमन्ना रागिनी एमएमएस ३ या सिनेमात दिसणार असल्याची माहिती समोर आली आहे. तिच्याशिवाय या सिनेमात आणखी एक आघाडीची बॉलिवूड अभिनेत्री पाहायला मिळणार आहे. अलिकडेच निर्माती आणि दिग्दर्शिका एकता कपूर हिने तिच्या आगामी 'रागिनी एमएमएस ३' सिनेमाबाबत एक अपडेट दिली होती. यामुळे आता एकता कपूर पुन्हा तिच्या या सिनेमामुळे चर्चित आली आहे. यावेळीही या सिनेमात एक नवीन स्टारकास्ट दिसणार आहे. अभिनेत्री तमन्ना भाटिया हिची या सिनेमात एण्ट्री झाली असून आता आणखी एका अभिनेत्रीची एण्ट्री सिनेमात झाली आहे. रिपोर्टनुसार, तमन्ना भाटियानंतर आता नोरा फतेही एकता कपूरच्या रागिनी MMS3 चा भाग बनली आहे. अभिनेत्री तमन्ना भाटिया लवकरच 'रागिनी एमएमएस ३' या हॉरर आणि थ्रिलर सिनेमात मुख्य भूमिका साकारणार आहे. तिला या सिनेमाची कथा आणि त्यातील भयपटाचा घटक खूप भावला असल्याचं तिने सांगितलं आहे. हा सिनेमा एकता कपूरच्या बालाजी मोशन पिक्चर्सच्या बॅनरखाली बनवला जात आहे. या वर्षाच्या अखेरीस या सिनेमाचं शूटिंग पूर्ण होणार असल्याची अपेक्षा आहे. तमन्नाच्या वर्कफ्रंटबद्दल सांगायचे झाल्यास तमन्ना भाटिया लवकरच 'वीवन' सिनेमात दिसणार आहे. 'वन: फोर्स ऑफ द फॉरेस्ट' हा हॉरर सिनेमा १५ मे २०२६ रोजी प्रदर्शित होऊ शकतो. या सिनेमात तमन्नासोबत सिद्धार्थ मल्होत्रा देखील दिसणार आहे.

# 'कॉकटेल २'मध्ये क्रीतिची एन्ट्री



बॉलिवूडचा सुपरहिट चित्रपट 'कॉकटेल'चा सीक्वेल येणार आहे. २०१२ मध्ये प्रदर्शित चित्रपटात दीपिका पदूकोन, सैफ अली खान आणि डायना पेंटी हे कलाकार दिसून आले होते. तर आता 'कॉकटेल २' मध्ये नवे चेहरे दिसून येतील. या चित्रपटाचे दिग्दर्शन होमी अदजानिया करणार असून यात क्रीति मुख्य नायिका असणार आहे. होमीने सोशल मीडियावर क्रीतिचे एक छायाचित्र शेअर करत त्यात 'कॉकटेल २' चा हॅशटॅग यूज केला आहे. याचबरोबर त्याने वर्क इन प्रोग्रेस असे नमूद करत चित्रपटाची तयारी सुरू असल्याचे संकेत दिले आहेत. चित्रपटाच्या कहाणीवरून अत्यंत गोपनीयता बाळगली जात आहे. परंतु या चित्रपटात आधुनिक नातेसंबंध आणि आधुनिक प्रेमाच्या नव्या छटेला प्रदर्शित करण्यात येणार असल्याचे मानले जात आहे. चित्रपटात क्रीति सेनॉनसोबत शाहिद कपूर आणि रश्मिका मंदाना मुख्य भूमिकेत असणार आहे. या तिघांची केमिस्ट्री प्रेक्षकांसाठी एक नवा अनुभव ठरू शकते. अलिकडेच रश्मिकाने दिग्दर्शक होमीच्या पोस्टला रीपोस्ट करत स्वत:चे मजेशीर छायाचित्र शेअर केले होते आणि त्यात 'वर्क इन प्रोग्रेस' असे लिहिले होते. क्रीति आणि शाहिद यापूर्वी 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया' या चित्रपटात एकत्र दिसून आले होते. 'कॉकटेल २' च्या निमित्ताने प्रेक्षकांना पुन्हा ही जोडी मोठ्या पडद्यावर पाहता येणार आहे. या चित्रपटाची निर्मिती मॅडॉक फिल्म्सच्या बॅनर अंतर्गत केली जाणार आहे. हा चित्रपट पुढील वर्षाच्या अखेरीस प्रदर्शित होण्याची शक्यता आहे.

# चित्रपटात अर्धशास्त्रीय नृत्याभिनयाचा अविष्कार :

# वैजयंतीमाला

**'दुनिया का मजा ले लो दुनिया तुम्हारी है।' १९५१ सालच्या हिंदीतील पहिल्याच 'बहार' चित्रपटात वैजयंतीमाला हातात डफ घेऊन नाचत येऊन सामूहिक नृत्य सहज व स्वच्छंद मुरलेल्या अभिनेत्रीसारखे सादर करतात. 'हैऽऽ' अशी नटखट शीळ घालून दुनियाका मजा ले लो-' सुरू होते.**

'सैया दिल में आना रे आकर फिर ना जाना रे' अवघ्या १५-१६ वर्षांची शोडषी वैजयंतीमाला प्रेमात उगवलेल्या अंकुराने आनंदात नायकाचा फोटो समोर ठेवून नृत्याभिनयात वरील गाणे म्हणते. उमललेल्या कळीसारखे टवटवीत सौंदर्य व अल्लड अदाकारीने प्रसंग दिलखेचक होतो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नव्या युगाची प्रथम शास्त्रीय नृत्यांगना नायिका अभिनेत्री म्हणून वैजयंतीमाला याच आहेत. या अभिनेत्रीने पहिल्याच चित्रपटापासून इंडस्ट्रीतील समस्त निर्माते निर्देशक यांचे लक्ष ओढवून घेतले.

१९५४ सालच्या 'नागीन' चित्रपटातील त्यांच्या सज्जड अभिनयाने व हेमंतकुमार यांच्या मधुर संगीताने त्या आधीचे सर्व रेकॉर्ड मोडीत काढले. 'मन डोले मेरा तन डोले...' क्ले-व्हायोलिनवर कल्याणजींनी वाजविलेल्या या गाण्यात सपेरा स्त्रीच्या पेहरावात खांद्यावर तिराचा भाता घेऊन वैजयंतीमाला यांचा प्रवेश नागीण नृत्याच्या पदन्यासासह होतो. दुसर्‍या अंतर्यात दोन्ही हात वर करून बोटे जुळवून हातांच्या मधून टाकलेला मोहक कटाक्ष विलोभनीय वाटतो. बिन वाजवीत उभे असलेल्या नायकाजवळ येऊन डोळे मिटून तल्लीन होऊन डोलण्याचा उत्तुंग अभिनय साकारतात. 'मेरा दिल ये पुकारे आजा। मेरे गमके सहारे आजा' वरील गाण्यातील आर्त आस नागीण चित्रपटात वैजयंतीमाला यांना लागली असते. मदभर्‍या पावसाळी वातावरणाचा मजा प्रियकराशिवाय अधुरा आहे. 'तू नहीं तो, ये ऋतू, ये हवा, क्या करु क्या करु' अशी नैराश्यवत अगतिकता ती प्रकट करते. 'तेरे मन की गंगा और मेरे मन की जमुना का बोल राधा बोल ये संगम होगा की नहीं' ओढ्यातून झरणार्‍या पाण्यातील प्रवाहात वैजयंतीमालांनी स्विमिंग वेशात पोहत पोहत आपल्या नशिल्या अंदाजात 'संगम' चित्रपटातील हा गाण्यातील प्रसंग अभिनित केला आहे. हा प्रसंग व 'बुड्ढा मिल गया' गाण्यातील प्रसंग सिनेमाचे आकर्षण ठरले होते. 'औरत ने जनम दिया मरदो का। मरदोने उसे बाजार दिया जब जी चाहा मछला कुचला। जब जी चाहा धुत्कार दिया' वैजयंतीमाला या दिग्गज अभिनेत्रीचा खर्‍या अर्थी 'साधना' चित्रपटात अभिनयाचा कस लागला. 'जिसे तू कबूल करले। वो दवा कहांसे लावू' शरदचंद्र यांच्या कथेवर आधारित 'देवदास' चित्रपटात चंद्रमुखीच्या भूमिकेत आपले संपूर्ण अभिनय कौशल्य पणास लावले. वैफल्याने ग्रासलेल्या व सदैव मद्यात धुंद असणार्‍या देवदासला मनविताना त्याचे चित्त थार्‍यावर आणण्यासाठी 'चंद्रमुखी' या गाण्यात विनवणी करते. दिलीप कुमार व वैजयंती दोघांचाही अभिनय केवळ पडद्यावरचा उरत नाही तर त्यात वास्तवता प्रकट होते. 'उडे जब जब जुल्फे तेरी। कुवारीयों का दिल मचले' 'नया दौर'मधील दिलीप व वैजयंतींचे या गाण्यावरचे अजरामर भांगडा नृत्य कोण विसरेल? प्रेमातील छेडछाड या सामूहिक भांगडा नृत्यात परस्परांना चिडवून उभयतांनी अप्रतिम सादर केले. 'आजा रे परदेसी। मै तो कबसे खडी इस पार' या गाण्याबद्दल लता मंगेशकर म्हणाल्या, वैजयंतीमाला गिरीकन्येच्या वेशात अत्यंत लोभस दिसत होत्या. पहाटेच्या वेळी हेमंत ऋतूत फुललेल्या व दवबिंदूत भिजलेल्या कुसुमाप्रमाणे भासत होत्या. प्रियकराला गाण्यातून साद घालतानाचा त्यांचा छद्मी प्रकार अभिनयाची उंची गाठतो. वैजयंतीमाला यांच्या नृत्यलालित्याचा उपयोग करून अनेक निर्मात्यांनी अमर कलाकृती सादर केल्या. १३ ऑगस्ट १९३६ रोजी तामिळनाडूतील त्रिपालिकेत वैजयंतीमाला यांचा जन्म झाला. त्यांनी भरतनाट्यम् या शास्त्रीय नृत्य शैलीत पारंगतत्व मिळविले.

कर्नाटक संगीत गायिका व नृत्य प्रशिक्षक म्हणूनही कार्य केले. १९४९ मध्ये तामिळ फिल्म 'वडकई'पासून सुरुवात झाली. १९५० साली तामिळ फिल्म 'जीवितम'मध्ये काम केले व दक्षिण भारतीय नायिकामध्ये प्रमुख म्हणून प्रसिद्ध झाल्या. १९५१ साली आलेला 'बहार' हा त्यांचा पहिला हिंदी चित्रपट आहे. त्या प्रसिद्ध व कुशल नृत्यांगना आहेत. त्यांनी हिंदीत अर्धशास्त्रीय नृत्य प्रकार प्रचलित केलेत. त्यांच्या थिरकत्या पदन्यासामुळे त्यांना 'ट्विनकल टोज' हा किताब मिळाला. ५०-६० च्या काळात हिंदी चित्रपटात प्रथम श्रेणीच्या नायिका कलाकार म्हणून ख्याती प्राप्त झाली. १९६८ साली त्या डॉ. चमनलाल बाली यांच्याशी विवाहबद्ध झाल्यात. १९७६ साली सुचिंद्र या पुत्ररत्नास जन्म दिला. १९८६ साली डॉ. बाली यांचे निधन झाले. त्यांनी जनसंघातून राजकारण प्रवेश केला. नंतर काँग्रेसमध्ये प्रवेश करून राज्यसभेवर नियुक्त झाल्यात. काही काळ राजकारणात राहिल्या. मुलासमवेत आजही सुखी आयुष्य वयाच्या ८९ व्या वर्षात जगत आहेत.



ठसठशीत व उमद लावण्य लेवून पदलालित्यातून अभिनयाचा कळस गाठण्यासाठी चंद्राची शीतल झळाळी, लाघवी हास्य टपोर्‍या नेत्रांची योग्य हलचल इ. आयुधांनी सात्त्विक प्रेमभाव, कधी करारी मुद्रा, कधी शोषित स्त्री तर त्याच टपोर्‍या नेत्रात गंगा जमना दाटून आणत कापोलावरून ओघळणारे अश्रुबिंद्ने व्यक्त केलेला मनाचा कोंडमारा व वेदना व्यक्त करणारा शाश्वत अभिनय. केवळ डीव्हाईन! १९५१ ते १९७० पर्यंत ५३ हिंदी व इतर भाषांतील अनेक चित्रपटात योगदान देऊन, वयाची मर्यादा व कौटुंबिक जबाबदार्‍या ओळखून चित्रपटापासून स्वतःला दूर ठेवले. सर्वोत्कृष्ट अभिनेत्री म्हणून फिल्म फेअर अवॉर्ड, १९५८ सालचा 'साधना', १९६१ चा 'गंगा जमना', १९६४ चा 'संगम' सर्वोत्कृष्ट सहअभिनेत्रीचा फिल्म फेअर अवॉर्ड. १९५५ चा 'देवदास' भारत सरकारतर्फे पद्मश्री पुरस्कार १९६८. भारत सरकारतर्फे पद्मविभूषण पुरस्कार २०२४. नवीन पिढीतील विशेषतः स्त्री अभिनेत्रींनी वैजयंतीमाला यांच्या चित्रपटाद्वारे प्रेरणा घेऊन दर्जेदार अभिनयाचे व नृत्याचे ¶गदान चित्रपटसृष्टीला द्यावे, हीच इच्छा! पद्मविभूषण व चित्रपटभूषण वैजयंतीमाला बाली यांना उत्तम आरोग्यासह शतायुषी आयुष्य लाभो, हीच त्या जगन्नीयंत्याकड प्रार्थना!

**रमेश पोफळी**

# तबल १८ वर्षांनंतर अक्षय अन् सैफ एकत्र



'जॉली एलएलबी ३'च्या चर्चेदरम्यान अक्षय कुमारने त्याच्या आणखी एका आगामी चित्रपटाचे शूटिंग सुरू केले आहे. या चित्रपटात प्रेक्षकांना १८ वर्षांनंतर अक्षय आणि सैफ अली खानची जोडी पाहायला मिळणार आहे. अलीकडेच या अभिनेत्याने एक व्हिडीओ शेअर केला आहे, ज्यामध्ये तो सैफबरोबर शूटिंग सुरू करताना दिसत आहे. खरंतर, अक्षय कुमार आणि सैफ अली खान १८ वर्षांनंतर प्रियदर्शनच्या 'हैवान' चित्रपटात एकत्र दिसणार आहेत, ज्याचे शूटिंगही दोघांनी सुरू केले आहे. त्याचवेळी, अक्षय कुमारने अलीकडेच त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर शूटिंगच्या पहिल्या दिवसाचा व्हिडीओ शेअर केला आहे. व्हिडीओमध्ये तो सैफ अली खान आणि प्रियदर्शनबरोबर चर्चा करताना दिसत आहे. हा व्हिडीओ चाहत्यांबरोबर शेअर करताना अक्षयने कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, आम्ही सगळे थोडेसे सैतान आहोत काही बाहेरून सैतान आहेत, तर काही आतून सैतान आहेत. माझा आवडता दिग्दर्शक प्रियदर्शनच्या 'हैवान' चित्रपटाचे शूटिंग सुरू केले आहे. जवळजवळ १८ वर्षांनंतर सैफबरोबर काम करण्यास मी खूप उत्साहित आहे. चला 'हैवानियत'ला सुरुवात करूया. अक्षयची ही पोस्ट आता मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. अक्षय आणि सैफने 'मैं खिलाडी तू अनाडी', 'ये दिल्लगी', 'तू चोर मैं सिपाही', 'कीमत' आणि 'टशन'सारख्या चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहे. 'टशन' हा त्यांचा शेवटचा एकत्र चित्रपट होता. व्हिडीओमध्ये सैफ-अक्षयही खूप उत्साही दिसत आहेत. अक्षय लवकरच 'जॉली एलएलबी ३'मध्ये दिसणार आहे. तसेच अक्षय कुमार 'वेलकम टू द जंगल' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'जॉली एलएलबी ३' हा चित्रपट १९ सप्टेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात त्याच्याबरोबर अर्शद वारसी असेल. यावेळी दोन्ही जॉली म्हणजे अर्शद वारसी आणि अक्षय एकाच चित्रपटात आहेत, तर सौरभ शुक्ला जज आहेत. अक्षय-अर्शदची जुगलबंदी यामध्ये बघायला मिळणार आहे.

# शर्वरी झळकणार आयुष्मानसोबत

सुरज बडजात्या हे अभिनेता आयुष्मान खुरानासोबत एका नव्या चित्रपटावर काम करत आहेत. बडजात्या यांनी आयुष्मानला एक समर्पित आणि उत्तम अभिनेता संबोधिले आहे. बडजात्या यांनी या चित्रपटाचे चित्रिकरण मुंबईत लवकरच सुरू होणार आहे. या चित्रपटात आयुष्मानची नायिका म्हणून मराठमोळी अभिनेत्री शर्वरी वाघची निवड करण्यात आली आहे. या चित्रपटाची कहाणी मुंबईवरच आधारित आहे. या चित्रपटात आणखी काही कलाकार असून त्यांच्या वाट्यालाही महत्त्वाची भूमिका येणार असल्याचे बडजात्या यांनी सांगितले आहे. प्रत्येक चित्रपटाचे चित्रिकरण सुरू करण्यापूर्वी मी काहीसा अस्वस्थ असतो. 'मैंने प्यार किया' या चित्रपटाच्या वेळी देखील असेच घडले होते. एक निर्माता म्हणून चित्रपट बॉक्स ऑफिसवर किती कमाई करेल हे महत्त्वाचे नाही, तर चित्रपटातील मागील विचार प्रेक्षकांपर्यंत पोहोचतोय की नाही हे माझ्यामते महत्त्वाचे असते असे बडजात्या यांनी म्हटले आहे. आयुष्मान सध्या रश्मिका मंदानासोबत 'थामा' चित्रपटाचे चित्रिकरण करत आहे. हा चित्रपट मॅडॉकच्या हॉरर कॉमेडी युनिव्हर्सचा हिस्सा असून तो दिवाळीच्या आसपास प्रदर्शित होणार आहे. याचबरोबर आयुष्मान हा करण जौहरच्या चित्रपटात दिसून येणार आहे. तर शर्वरी ही आलिया भट्टसोबत वायआरएफ स्पाय युनिव्हर्सच चित्रपट 'अल्फा'मध्ये मुख्य भूमिका साकारत आहे. हा चित्रपट नाताळाच्या आसपास प्रदर्शित होणार आहे.



# रिंकूला हवाय असा बेटर हाफ?

सैराटफेम अभिनेत्री रिंकू राजगुरु तिच्या बेटर हॉपची लव्हस्टोरी या नव्या सिनेमामुळे चर्चेत आहे. या सिनेमात रिंकने अभिनेता सुबोध भावे आणि अभिनेत्री प्रार्थना बेहेरे यांच्यासोबत स्क्रिन शेअर केली आहे. या सिनेमाला घेऊन ती मुलाखत देत आहे. आता अशाच एका मुलाखतीत रिंकूला तिचा बेटर हाफ कसा हवा? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावेळी तिने भन्नाट उत्तर दिलं आहे. त्याची जोरदार चर्चा होत आहे. सैराट सिनेमानंतर रिंकू राजगुरु हे नाव महाराष्ट्राला परिचयाचं झालं आहे. तिने अनेक सिनेमे आणि सिरीजमधून प्रेक्षकांच्या मनोरंजन केलं आहे. रिंकू राजगुरुचा सोशल मीडियावर मोठा चाहतावर्ग आहे. सोशल मीडियावर रिंकू नेहमी सक्रिय असते. ती नेहमी आपल्या चाहत्यांसोबत कनेक्ट राहण्यासाठी पोस्ट शेअर करत असते. तिच्या पोस्टला चाहते देखील कमेंट्स करतात. सैराटमधील आर्ची आणि परशा हे खऱ्या आयुष्यातही एकमेकांना डेट करत असल्याच्या चर्चा अनेकदा होत असतात. मात्र, रिंकूने कायमच या चर्चांना नकार दिला आहे. एका मुलाखतीत रिंकूला तिचा बेटर हाफ कसा असावा? असा प्रश्न विचारण्यात आला. यावर तिने असा मी काही विचार केला नाही. बघितल्याच क्षणी वाटलं पाहिजे की हाच तो! सगळ्या मुलींना जे हवं असतं तेच की तो आदर देणारा आणि काळजी घेणारा असावा. गृहित धरणारा नसावा, असं उत्तर तिने दिलं. पुढे ती म्हणाली बायको म्हणणारा असेल तर ये..गर्लफ्रेंड म्हणणारा असेल तर आपल्याला नको. ाजकाल जे चालू आहे ते पाहून तर असंच वाटतं, असंही तिने स्पष्ट केलं.



# सोनू निगमने केले शाहरुखचे कौतुक

शाहरुख खानचा अभिनय संपूर्ण जगाला आवडतो. शाहरुख त्याच्या चांगल्या अभिनयासोबतच चांगल्या कामासाठीही ओळखला जातो. इंडस्ट्रीशी संबंधित लोक अनेकदा त्याच्याशी संबंधित किस्से सांगतात. अलिकडेच गायक सोनू निगमनेही किंग खानचे कौतुक केले आहे. सोनू निगमने तर असेही म्हटले आहे की त्याने शाहरुखसारखा उत्तम वागणारा दुसरा कोणताही अभिनेता पाहिला नाही.

सोनू निगमने अलीकडेच फरीदून शहरयारशी झालेल्या संभाषणात शाहरुख खानबद्दल बोलले. गायकाने शाहरुखचे कौतुक केले आणि म्हटले की, 'तो (शाहरुख) खरोखरच एक खास व्यक्ती आहे, जो कठोर परिश्रमाने त्याच्या क्षेत्रात वर पोहोचला आहे'. सोनू निगमने शाहरुख खानच्या नम्र वागणुकीचे आणि उदारतेचेही कौतुक केले. तो म्हणाला की त्याने मुख्य प्रवाहातील कोणताही अभिनेता इतका सभ्यपणे वागताना पाहिलेला नाही, तर त्याच्याकडे अहंकाराची अनेक कारणे असू शकतात. सोनू निगमने सांगितले की अलीकडेच त्याची आमिर खानशी मैत्री झाली. सोनू निगमने आमिरला एक अद्भुत व्यक्ती म्हणून देखील वर्णन केले, परंतु असेही म्हटले की शाहरुखने गेल्या काही वर्षांत दाखवलेल्या सातत्याला अतुलनीय मानले. ते म्हणाले की शाहरुख खानने नेहमीच त्याला त्याच्या गाण्यांसाठी श्रेय दिले आहे, जरी त्याला तसे करण्यास भाग पाडले नसले तरीही. सोनू निगम यांनी जोर देऊन सांगितले की इंडस्ट्रीमध्ये शाहरुखसारख्या दर्जाच्या व्यक्तीने इतरांच्या योगदानाचा उघडपणे स्वीकार करणे आणि प्रशंसा करणे खूप दुर्मिळ आहे. जिथे श्रेय देणे योग्य आहे तिथे श्रेय द्या. सोनू निगम म्हणाले की, इतरांना त्यांच्या कामाचे श्रेय देण्याची शाहरुख खानची सवय त्यांना विशेषतः आवडते, विशेषतः जेव्हा इंडस्ट्रीतील बरेच लोक इतरांच्या योगदानाकडे दुर्लक्ष करतात. ते म्हणाले की गायक अनेकदा प्रतिष्ठित गाणी गातात, परंतु इतर त्यांना आदर न देता पुरस्कार घेतात. परंतु, शाहरुख खान नेहमीच हे टाळतो. सोनू निगमने शाहरुख खानसाठी 'कल हो ना हो', 'सूरज हुआ मद्धम', 'मैं अगर कहूं', 'दो पल', 'तुम्ही देखो ना', आणि 'ये दिल दीवाना' यासह अनेक गाणी गायली आहेत.पाहायला मिळणार आहे. चित्रपटसृष्टीसाठी आणि प्रेक्षकांसाठी हे खरंच एक मोठं रीयुनियन ठरणार आहे.

